नि. फौजदारी खटला क्र. **१०५३/२०२३**
सरकार विरूद्ध राजकुमार वामन
**निशाणी ३५**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ६ ची जबानी**

सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो/करते की,

माझे नाव : वैभव रामजी वानखडे
वय : २६ वर्षे,
धंदा : शेती,
राहणार : वारूळा, ता. अकोट, जि. अकोला.

**सरतपासणी — अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती पी. एल. हरणे यांचेमार्फत —**

फिर्यादी विनोद यांना ओळखतो. ते माझे घराजवळ राहतात. मी राजकुमार वानखडे व कविता वानखडे यांना ओळखतो. ते माझे घराशेजारी राहतात. ते दोन्ही न्यायालयासमक्ष आरोपीच्या पिंज—यात हजर आहेत. घटना दि. ०३/०८/२०२३ रोजी रात्रीचे ०८:०० वाजेला विनोद वानखडे याच्या घराजवळ घडली. घटनेदरम्यान फिर्यादी व आरोपी यांचे भांडण चालु होते. भांडणामध्ये आरोपी क्र. १ याने विनोद वानखडे याला गोटा मारला होता. आरोपीने तीन जागी गोटा मारला होता. एक पायाच्या गुडघ्याला, एक उजव्या पायाच्या मांडीला आणि एक डोक्याला मारला होता. डोक्याला गोटा लागल्यामुळे फिर्यादीच्या डोक्याचे रक्त निघाले होते. आरोपी क्र. २ हिने फिर्यादी विनोद वानखडे याला शिवीगाळ केली व म्हणाली की, 'मी तुला पाहुन घेणार'. त्यानंतर मी भांडण सोडवले. जो गोटा फिर्यादीला आरोपींनी मारला तो मला दाखवल्यास मी त्याला ओळखु शकतो. (जप्त मुद्देमालाची सिल दोन्ही पक्षांसमक्ष उघडण्यात आली.) साक्षीदार जप्त मुद्देमाल पाहुन सांगतो की, याच दगडाने आरोपीने फिर्यादीला मारले होते. सदर जप्त मुद्देमाल दगडास **मुद्देमाल वस्तु क्र. 'अ'** देण्यात येतो. पोलीसांनी मला विचारपुस करून माझे बयान नोंदवले होते. **सरतपास पुर्ण.**

**उलटतपासणी — दोन्ही आरोपींतर्फे एस. जे. सांगोळे यांच्या मार्फत.**

२. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी विनोद वानखडे हे माझे नातेवाईक आहे. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी व आरोपी यांच्यात जुने वाद आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळी पोहोचलो त्यावेळी आरोपी व फिर्यादी यांच्यात केवळ बोलाचाल झाली होती. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, त्यांच्यादरम्यान भांडण चालु होते. हे म्हणणे खरे नाही की, माझेसमक्ष आरोपींनी फिर्यादीला मारझोड केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने फिर्यादीला दगड मारला नाही. फिर्यादी यांनी आरोपीच्या आईला दगड मारला होता किंवा कसे हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे समक्ष आरोपींनी फिर्यादीला मारहाण केल्याची घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी माझे नातेवाईक असल्यामुळे मी त्यांच्या सांगण्यावरून पोलीसांना खोटे बयान दिले. घटनेवेळी माझे आरोपीच्या आईसोबत बोलणे झाले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे. **उलटतपास पुर्ण.**

**फेरतपासणी — काही नाही.**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत.

**स्वा/—**

दि. १२.११.२०२५
अकोट

(ए.ए. माळी)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र. २)
अकोट, ता. आकोट, जि. अकोला.